अत्यंत महत्त्वाचे/कालमर्यादीत

# University of Mumbai

परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०० ०९८.

क्र.परीक्षा/निकाल कक्ष/१८८९/२०१७

परिपत्रक :–

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेद्रांचे समन्वयक/संचालक आपल्या सर्वांच्या निदर्शनास आणुन देण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक **No.Exam/Result/1858/2017 dated 6th April, 2017 व क्र.परीक्षा/निकाल कक्ष/१८७१/२०१७ दि. १२ मे, २०१७** अन्वये एप्रिल/मे, २०१७ मध्ये घेतलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे Internal/Oral/Practical/Theory/Viva/Project या अंतर्गत मुल्याकंनाचे गुण व Lower Examination's SGPA विद्यापीठाकडे पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते.

उपरोक्त परिपत्रकांमध्ये नमुद केलेली मुदत संपुष्टात येऊन सुध्दा, अद्यापही काही महाविद्यालयांकडुन उपरोक्त प्रमाणेचा तपशील विद्यापीठाकडे परिपूर्णरित्या पाठविण्यात आलेला नाही, असे निदर्शनास येते.

तरी उपरोक्त बाबतीत सर्व संबंधितांना पुन:श्च कळविण्यात येते की, ज्या अभ्यासक्रमांचे परीक्षा अर्ज MKCL या प्राधिकरणामार्फत ऑनलाइन घेण्यात आलेले आहेत; या सर्व अभ्यासक्रमांचा उपरोक्त प्रमाणेचा बाकी राहून गेलेला तपशील दि. १७ जून, २०१७ पर्यंत MKCLया प्राधिकरणाने उपलब्ध करून दिलेल्या वेबलिंक वर ऑनलाइन भरावा व या भरलेल्या तपशीलाची System Generated copy प्राचार्यांच्या/संबंधितांच्या सही शिक्क्यानिशी दि. २० जून, २०१७ पर्यंत विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडे हस्तेपोच सादर करावा.

ज्या अभ्यासक्रमांचे परीक्षा अर्ज विद्यापीठाच्या C.C.F या विभागामार्फत ऑनलाइन घेण्यात आलेले आहेत; या सर्व अभ्यासक्रमांचा उपरोक्त प्रमाणेचा बाकी राहून गेलेला तपशील दि. १७ जून, २०१७ पर्यंत C.C.F या विभागाने उपलब्ध करून दिलेल्या वेबलिंक वर ऑनलाइन भरावा व या भरलेल्या तपशीलाची System Generated copy प्राचार्यांच्या/संबंधितांच्या सही शिक्क्यानिशी दि. २० जून, २०१७ पर्यंत विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडे हस्तेपोच सादर करावा.

तसेच ज्या अभ्यासक्रमांचे अर्ज पारंपारिक पध्दतीने Hard Copy स्वरूपात घेण्यात आलेले आहेत, या सर्व अभ्यासक्रमांचा उपरोक्त प्रमाणेचा बाकी राहून गेलेला तपशील दि. १९ जून, २०१७ पर्यंत प्राचार्यांच्या/संबंधितांच्या सही शिक्क्यानिशी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडे हस्तेपोच सादर करावा.

**उक्त नमुद केलेल्या मुदतीत उपरोक्त प्रमाणेचा तपशील प्राप्त न झाल्यास संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात येतील व या संदर्भात पुढे काही बाब उद्‌भवल्यास यास संबंधित महाविद्यालयास सर्वस्वी जबाबदार धरून अशा महाविद्यालयांवर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.**

उपरोक्त सर्व बाबींची संबंधीतांनी नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी व निकाल जाहिर करण्याच्या प्रक्रियेस सहकार्य करावे ही विनंती.

मुंबई – ४०००९८
दि. १४ जून, २०१७.

(दीपक वसावे)
स्था. संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

अ. प्रत:–

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेद्रांचे समन्वयक/संचालक

ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:–

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग
३. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग

क. प्रत माहितीसाठी अग्रेषित:–

१. मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
४. मा. कुलसचिव व संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक